| Edelweiss Arbitrage Fund - Direct Plan Monthly IDCW Option | 0.11 | | 18.2724 | |
| Edelweiss Arbitrage Fund - Regular Plan Monthly IDCW Option | 0.11 | | 16.8143 | |
| Edelweiss Balanced Advantage Fund - Direct Plan Monthly IDCW Option | 0.18 | | 26.19 | |
| Edelweiss Balanced Advantage Fund - Regular Plan Monthly IDCW Option | 0.18 | | 20.63 | |
| Edelweiss Equity Savings Fund - Direct Plan Monthly IDCW Option | 0.08 | | 16.7042 | |
| Edelweiss Equity Savings Fund - Regular Plan Monthly IDCW Option | 0.08 | | 14.4791 | |
| Edelweiss Gold and Silver ETF FOF - Direct Plan IDCW Option | 1.60 | | 32.152 | |
| Edelweiss Gold and Silver ETF FOF - Regular Plan IDCW Option | 1.60 | | 31.662 | |
| Edelweiss Large Cap Fund- Plan B - IDCW option | 5.00 | | 81.8 | |
| Edelweiss Large Cap Fund- Plan C - IDCW option | 5.00 | | 67.63 | |
| Edelweiss MSCI (I) DM & WD HC 45 ID Fund - Direct Plan IDCW Option | 2.00 | | 24.2403 | |
| Edelweiss MSCI (I) DM & WD HC 45 ID Fund - Regular Plan IDCW Option | 2.00 | | 23.4656 | |
| Edelweiss NIFTY Large Mid Cap 250 Index Fund - Direct Plan IDCW Option | 1.00 | | 17.448 | |
| Edelweiss NIFTY Large Mid Cap 250 Index Fund - Regular Plan IDCW Option | 1.00 | | 16.9229 | |
| Edelweiss Nifty Smallcap 250 Index Fund - Direct Plan IDCW Option | 1.20 | | 18.772 | |
| Edelweiss Nifty Smallcap 250 Index Fund - Regular Plan IDCW Option | 1.20 | | 18.3137 | |
| Edelweiss Liquid Fund- Direct Plan Annual IDCW Option | 150.00 | Friday, July 24, 2026** | 3638.5469 | ₹ 1000.00 |
| Edelweiss Liquid Fund- Direct Plan IDCW Option | 150.00 | | 3638.5863 | |
| Edelweiss Liquid Fund- Regular Plan Annual Dividend | 150.00 | | 2464.8083 | |
| Edelweiss Liquid Fund - Regular Plan Dividend | 150.00 | | 3562.3083 | |
| Edelweiss Overnight Fund - Direct Plan Annual IDCW Option | 70.00 | | 1415.5475 | |
| Edelweiss Overnight Fund - Regular Annual IDCW Option | 70.00 | | 1409.6872 | |

**Pursuant to payment of IDCW, the NAV of the aforementioned IDCW Options of the Schemes will fall to the extent of payout and statutory levy, if any.**

*Distribution of the above IDCW is subject to availability of distributable surplus as on the Record Date and as reduced by the amount of applicable statutory levy, if any. Considering the volatile nature of the markets, the Trustee reserves the right to restrict the quantum of IDCW upto the per unit distributable surplus available under the Schemes on the Record Date in case of fall in the market.

**or the immediately following Business Day if that day is a Non-Business Day.

All Unit holders whose name appears in the Register of Unit holders of the aforementioned IDCW Options of the Schemes as at the close of business hours on the Record Date shall be eligible to receive the IDCW so declared.

Investors are requested to take note of the above.

For **Edelweiss Asset Management Limited**
(Investment Manager to Edelweiss Mutual Fund)
Sd/-
Radhika Gupta
**Managing Director & CEO**
**(DIN: 02657595)**

Place : Mumbai
Date : July 21, 2026

For more information please contact:
**Edelweiss Asset Management Limited** (Investment Manager to Edelweiss Mutual Fund)
CIN: U65991MH2007PLC173409
**Registered Office & Corporate Office:** Edelweiss House, Off C.S.T Road, Kalina, Mumbai – 400 098.
**Tel No: +91 22 4097 9737, Toll Free No. 1800 425 0090 (MTNL/BSNL), Non Toll Free No. 91 40 23001181, Fax: +91 22 40979878,**
Website: www.edelweissmf.com

**MUTUAL FUND INVESTMENTS ARE SUBJECT TO MARKET RISKS, READ ALL SCHEME RELATED DOCUMENTS CAREFULLY.**

# पाडकामात नेत्यांचा हस्तक्षेप कशासाठी?

## नवी मुंबईतील बेकायदा बांधकामप्रकरणी उच्च न्यायालयाची विचारणा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेकायदा बांधकामांवरील कारवाई अनेकदा स्थानिक नेत्यांकडून रोखले जाते, असा दावा याचिकाकर्त्यांच्या वतीने मंगळवारी उच्च न्यायालयात करण्यात आला. त्याची दखल घेऊन पालिकेच्या तोडकामाच्या कारवाईत राजकीय नेते हस्तक्षेप करतातच कसे?, असा संतप्त प्रश्न न्यायालयाने केला.

पालिका हद्दीतील बेकायदा बांधकामांना जबाबदार सात अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगून त्यांची नावे महापालिकेच्या वतीने न्यायालयात सादर करण्यात आली. त्याची दखल घेऊन सात अधिकाऱ्यांवर कारवाईचे ठीक; परंतु अन्य अधिकाऱ्यांचे काय? या समस्येचे मूळ असलेल्या विकासकांवरील कारवाईचे काय? त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत काय उपाययोजना केल्या? अशी विचारणाही यावेळी न्यायालयाने केली. तसेच त्याबाबत भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश महापालिकेला दिले. नवी मुंबईतील सुमारे चार हजारांहून अधिक अनधिकृत इमारतींप्रकरणी वकील किशोर शेट्टी यांनी अवमान याचिका केली आहे, त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने उपरोक्त प्रश्न उपस्थित केले.

पाणी कापून इमारती कधीच रिकाम्या होणार नाहीत. इमारतींवर कारवाईची जबाबदारी नवी मुंबई महापालिकेची असून मूळ भूखंड सिडकोच्या मालकीचे आहेत. त्यामुळे, कारवाईबाबत पालिका आणि सिडकोमध्ये या संदर्भात काही समन्वय आहे का? त्याबाबतही न्यायालयाने भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले आहेत.

### राजकीय दबाव येत असल्याचा पालिकेचा दावा

अनेकदा इमारतींवर कारवाई करण्यात येऊ नये यासाठी पालिका अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव येत असल्याचा दावा सुरुवातीला पालिकेकडून करण्यात आला. त्यावर ही बाब आम्ही नोंदीवर घेऊ का, अशी विचारणा करून त्याबाबत माहिती देण्याचे न्यायालयाने म्हटले. तथापि, नोंदीवर असे वक्तव्य करण्यास पालिकेतर्फे असमर्थता दाखवण्यात आली. मात्र, याचिकाकर्त्याने महापालिकेच्या दाव्याचे समर्थन करून त्यात तथ्य असल्याचे न्यायालयाला सांगितले.

**बेकायदा बांधकामांचे सत्र सुरूच**

बेकायदा इमारतींच्या बांधकामांचे सत्र सुरू असून ऐरोलीमध्ये जवळपास ३० इमारती बांधकामाधीन असल्याचेही पालिकेने न्यायालयाला सांगितले. त्याची दखल घेऊन या इमारतींची छायाचित्रे आणि अतिरिक्त माहिती पालिकेला द्यावी. त्यानंतर पालिकेने त्यावर योग्य ती कारवाई करण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

# समलैंगिक संबंधांसाठी दबावामुळे हत्या

**ठाणे :** कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्याकडून समलैंगिक संबंधांसाठी वारंवार दबाव आणि छळ होत असल्याच्या आरोपातून दोन कर्मचाऱ्यांनी त्यांची हत्या केल्याचा प्रकार ठाणे जिल्ह्यात उघडकीस आला आहे.

या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना २४ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

आरोपींनी हत्येसाठी आठवडाभर आधी धारदार शस्त्र खरेदी केले होते. २५ जून रोजी वरिष्ठांना दुचाकीवरून मामनोली परिसरात नेत तेथे धारदार शस्त्राने गळ्यावर वार करून त्यांची हत्या करण्यात आली. त्यानंतर मृतदेह जंगलात फेकून देण्यात आला. निर्जन भाग असल्याने मृतदेह तीन दिवस तेथेच पडून होता, असे पोलिसांनी सांगितले.

# दादर, अंधेरी, मानखुर्दमधील घटना मानवी चुकांमुळेच

## बेस्ट प्रशासनाचा दावा; तिन्ही अपघातांमध्ये चालकच दोषी

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** दादरच्या वीर कोतवाल उद्यानाजवळील अपघात आणि वाहनांना धडक, अंधेरीतील १४ वाहनांना धडक आणि मानखुर्द पुलाच्या कठड्याला बेस्टच्या कंत्राटी बसने दिलेली धडक या सर्व अपघातांना मानवी चुका कारणीभूत असल्याचे मंगळवारी बेस्ट उपक्रमाकडून स्पष्ट करण्यात आले.

या सर्व अपघातातील बस सुस्थितीत असून त्यात कोणताही तांत्रिक दोष नव्हता. चौकशीत चालकच दोषी असल्याचा दावा करत कंत्राटदाराला मात्र मोकळे सोडण्यात आले. मानखुर्द येथे झालेल्या बेस्ट बस अपघातानंतर मंगळवारी झालेल्या बेस्ट समितीच्या बैठकीत वाढत्या अपघातांबाबत समिती सदस्यांनी हरकतीचा मुद्दा उपस्थित केला. त्यानंतर बेस्ट समितीने अपघातामागील कारणही स्पष्ट केले.

मानखुर्द येथील बस अतिवेगातच होती. जून महिन्यात दादरमध्ये प्लाझा सिनेमागृहाजवळ विद्युत एसी बसचा भीषण अपघात झाला होता. हँडब्रेक सोडताच त्वरित एक्सीलरेटरवर पाय दिल्याने हा अपघात झाला होता.

अंधेरी (पश्चिम) आंबोली येथे १० जुलै रोजी सीएनजी बसने १४ वाहनांना धडक दिल्याची घटना घडली होती. या बसमध्ये चालकाने ब्रेक दाबला नसल्याने बस वाहनांना धडकली होती. या घटनांमधील तीन्ही बस या भाडेतत्त्वावर पुरवठा करणाऱ्या खासगी कंत्राटदारांच्या आहेत. या सर्व घटना मानवी चुकांमुळे घडल्याचे बेस्ट उपक्रमाकडून स्पष्ट करण्यात आले.

> मानखुर्दमधील घटना ही बेस्ट बस चालकाच्या बेदरकारपणे गाडी चालविल्यामुळे घडली असून त्याने बसचा वेग कमी केला नाही. कंत्राटी बसचे वाढते अपघात पाहता भाडेतत्त्वाच्या बसवर आता विश्वास नाही. बेस्टने स्वमालकीच्या बसची संख्या वाढवण्याची गरज आहे.
>
> **– तृष्णा विश्वासराव,** अध्यक्ष, बेस्ट समिती

### कंत्राटदारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

मानखुर्दमधील घटनेतील बस मातेश्वरी कंपनीची होती. बेस्टच्या अपघातांमध्ये मातेश्वरी कंपनीच्याच बस अधिक असल्याचा आरोप बेस्ट समिती सदस्य अजय सिंह यांनी केला. चालक रात्रभर ड्युटी करून परत सकाळी बसवर चालक म्हणून काम करू लागला. अशा प्रकारे अतिरिक्त कामाची जबाबदारी सोपविणे बंद करा आणि कंत्राटदारांवरही कारवाई करा, अशी मागणी त्यांनी केली.

# तलावाभोवतालची अतिक्रमणे हटवा

## सुनावणीपूर्वी स्वच्छतेचे पालिकेला आदेश

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** कांदिवली-चारकोप येथील एका नैसर्गिक तलावाभोवतालची अतिक्रमणे हटवण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी दिले. तलावाची दुरवस्था आणि परिसरातील खारफुटीच्या होणाऱ्या नुकसानासाठी अनधिकृत बांधकामे व सर्रासपणे टाकला जाणारा कचरा हे कारणीभूत असल्याची टिप्पणीही न्यायालयाने केली.

तलावाच्या परिसरातील नवीन छायाचित्रे पाहिल्यानंतर प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठाने पुन्हा एकदा आश्चर्य व्यक्त केले. तसेच, गेल्या आठवड्यापासून परिस्थिती अधिकच बिघडल्याचे नमूद केले. पुढील सुनावणीच्या वेळी त्याच कोनातून काढलेली नवीन छायाचित्रे सादर करण्याचे आदेश महापालिकेला देऊन त्या तलावात कोणताही कचरा खपवून घेतला जाणार नाही, असे न्यायालयाने बजावले.

खारफुटीच्या ५० मीटरच्या संरक्षित क्षेत्रात (बफर झोन) असलेल्या या तलावाच्या संवर्धनाचे काम हाती घेण्याची परवानगी मिळण्यासाठी महापालिकेने उच्च न्यायालयात याचिका केली आहे. प्रभारी मुख्य न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर मंगळवारी सुनावणी झाली.

दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, तलावाभोवती झालेल्या अतिक्रमणांमुळे आणि कचऱ्यामुळे तलावाची कोंडी होत आहे. एकदा ही अतिक्रमणे हटवली गेल्यावर कचरा टाकणे थांबेल आणि कचरा साफ केल्यानंतर, नैसर्गिकरित्या खाऱ्या पाण्याचा प्रवाह पुन्हा सुरू होईल, अशी टिप्पणी न्यायालयाने केली. यापूर्वीच्या सुनावणीदरम्यानही, न्यायालयाने तलावाभोवती टाकलेला बांधकामाचा राडारोडा दाखवणाऱ्या छायाचित्रांवर चिंता व्यक्त केली होती आणि या दृश्याला भयंकर, असे संबोधले होते. छायाचित्रांमध्ये तिथे पडलेले वॉशबेसिन आणि कमोड दिसत होते.

### ‘सुशोभीकरण असेल तर आक्षेप नाही’

खऱ्या अर्थाने संवर्धनासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजनांना संस्थेचा कोणताही आक्षेप नाही, असे मूळ याचिकाकर्ते ‘बॉम्बे एन्व्हायर्नमेंटल ॲक्शन ग्रुप’च्या (बीईएजी) वतीने न्यायालयाला सांगण्यात आले. त्यामुळे, हे केवळ सुशोभीकरण असेल, तर आम्हाला काहीच अडचण नाही. परंतु, पूर्वी मंजुरीच्या प्रत्येक टप्प्यावर हा प्रकल्प सुशोभीकरणाच्या पलीकडे विस्तारत जात होता, असेही बीईएजीतर्फे न्यायालयाला सांगण्यात आले.

# ‘एफडीए’चे राज्यभरात ५३ ठिकाणी छापे

## दुग्धजन्य पदार्थांसह सुमारे १.८५ कोटी रुपयांचा साठा जप्त

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**मुंबई :** १६ ते २० जुलैदरम्यान एफडीएने राबविलेल्या विशेष मोहिमेत तब्बल ५३ ठिकाणी छापे टाकण्यात आल्या. या कारवाईत गुटखा, पान मसाला, दूध, दुग्धजन्य पदार्थ आणि इतर अन्नपदार्थांचा सुमारे १.८५ कोटी रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

याचबरोबर नागरिकांना थेट तक्रार नोंदवता यावी यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित तक्रार पोर्टलही सुरू करण्यात आले आहे.

राज्यव्यापी विशेष तपासणी मोहिमेत १,७३१ लिटर दूध आणि ८९६ किलो दुग्धजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. गोवंडीतील सूफी डेअरीमध्ये अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन झाल्याने १,६८३ लिटर दूध जप्त करून जागेवरच नष्ट करण्यात आले. लातूरमध्ये संशयित खवा, धाराशिवमध्ये शालेय पोषण आहारातील सोयाबीन वडी, तसेच सिन्नरमधील दोन दूध व्यवसायांवरही कारवाई करण्यात आली.

राज्यातील १०३ हॉटेल, रेस्टॉरंट आणि धाब्यांची तपासणी करून ३४ आस्थापनांना सुधारणा नोटिसा देण्यात आल्या, तर १६ आस्थापनांचे परवाने निलंबित करण्यात आले. पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक आणि इतर विभागांतील अनेक आस्थापनांमध्ये स्वच्छता व अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळून आले.

# कुडाळकरांविरोधातील चौकशी आदेश रद्द

**मुंबई :** म्हाडाच्या जमिनीवर अतिक्रमण केल्याच्या आणि सार्वजनिक निधीचा गैरवापर केल्याच्या आरोपांप्रकरणी शिवसेना आमदार मंगेश कुडाळकर यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचे आदेश देणारा विशेष न्यायालयाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला दिलेला आदेश उच्च न्यायालयाने रद्द केला.

विशेष न्यायालयाने डिसेंबर २०२५मध्ये कुडाळकर यांच्या एसीबी चौकशीचा आदेश दिला होता. तथापि, हा आदेश प्रक्रियेतील त्रुटींसह पारित करण्यात आला होता, असे नमूद करून न्यायमूर्ती शिवकुमार डिगे यांच्या एकलपीठाने तो रद्द केला. तसेच, विशेष न्यायालयाला या प्रकरणावर गुणवत्तेच्या आधारे पुन्हा सुनावणी घेण्याचे आदेश दिले. हा आदेश संबंधित लोकसेवकाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याकडून कोणताही अहवाल न मागवता आणि कुडाळकर यांना आपली बाजू मांडण्याची संधी न देता पारित करण्यात आला होता. त्यामुळे, सकृतदर्शनी तो भारतीय नागरिक सुरक्षा संहितेच्या (बीएनएनएस) तरतुदींशी विसंगत असल्याचेही न्यायालयाने विशेष न्यायालयाचा आदेश रद्द करताना स्पष्ट केले.

**प्रकाशन सूचना**

**राष्ट्रीय ग्राहक विवाद निवारण आयोग**
**भारत सरकार**
(ग्राहक संरक्षण अधिनियम, 1986 अंतर्गत स्थापन)
उपभोक्ता न्याय भवन, 'पी' ब्लॉक, जनरल पूल ऑफिस कॉम्प्लेक्स, आय.एन.ए., नवी दिल्ली - 110023
दूरध्वनी क्रमांक : 011-24608735 / 011-24608756
ई-मेल : Fa.ncdrc@gmail.com
**प्रथम अपील क्रमांक : NC/FA/1096/2023**
**सोबत**
**NC/IA/15026/2023, NC/IA/15027/2023**

महाराष्ट्र राज्य आयोगातील तक्रार क्रमांक CC/17/377 मध्ये दिनांक 30 ऑगस्ट 2023 रोजी पारित करण्यात आलेल्या आदेशाविरुद्ध

**श्री. नरेंद्र आर. पटेल** **...याचिकाकर्ते/अपीलकर्ते**

विरुद्ध

**श्री. ॲलन क्वेरोबियस फर्नांडिस व इतर** **...विरोधी पक्षकार/प्रतिवादी**

प्रति,

**1. श्री. छबिलदास जी. शाह**
भागीदार, एम/एस वास्तू डेव्हलपर (हीराल)
कार्यालयाचा पत्ता : 601, संस्कृती बिल्डिंग, ग्रीनवूड समोर, आयसीआयसीआय बँकेच्या वर, चिकुवाडी लिंक रोड, बोरिवली (प.), मुंबई - 400092, महाराष्ट्र.

**2. श्री. छबिलदास जी. शाह**
एफ विंग, फ्लॅट क्रमांक 1239, गोवर्धननगर, पोईन्सर जिमखानासमोर, कांदिवली (प.), मुंबई - 400067.

**सूचना**

ज्या अर्थी, महाराष्ट्र राज्य आयोगाने तक्रार क्रमांक CC/17/377 मध्ये दिनांक 30-08-2023 रोजी पारित केलेल्या आदेशाविरुद्ध दाखल करण्यात आलेल्या **प्रथम अपील क्रमांक 1096/2023** मध्ये आपणास प्रतिवादी क्रमांक 5 (R-5) म्हणून पक्षकार करण्यात आले आहे.

आणि ज्या अर्थी, या आयोगाने दिनांक 17-03-2026 रोजीच्या आदेशाद्वारे, या प्रकाशनाद्वारे प्रतिवादी क्रमांक 5 (R-5) यांना नोटीस बजावण्याचे निर्देश दिले असून, ही बाब **17-08-2026** रोजी परत सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

म्हणून, या प्रकाशनाद्वारे आपणास नोटीस देण्यात येते की, आपण दिनांक **17-08-2026** रोजी या मा. आयोगासमोर स्वतः किंवा आपल्या विधि सल्लागार/अधिकृत प्रतिनिधीमार्फत उपस्थित राहावे. अन्यथा, आपल्या अनुपस्थितीत उपलब्ध अभिलेखांवरील गुणदोषांच्या आधारे सदर अपिलाचा निकाल देण्यात येईल.

**सही/-**
**सहाय्यक निबंधक**
**स्थळ : नवी दिल्ली**

**सुप्रिया लाईफसायन्स लिमिटेड**
**सीआयएन: L51900MH2008PLC180452**
**नोंदणीकृत कार्यालय:** २०७/२०८, उद्योग भवन, सोनावाला रोड, गोरेगाव (पूर्व), मुंबई - ४०००६३
**ईमेल:** cs@supriyalifescience.com / **दूरध्वनी:** + ९१ २२ ४०३३ २७२७/ **वेबसाइट:** www.supriyalifescience.com

**पोस्टल बॅलट आणि ई-व्होटिंग माहितीची सूचना**

सूचना देण्यात येत आहे कि कंपनी कायदा, २०१३ ('कायदा') च्या कलम ११०, कलम १०८ आणि इतर लागू तरतुदी, जर असतील तर, (सध्या लागू असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुर्नअधिनियमासह), कंपनीज (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २० आणि २२, ('नियम'), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या नियम ४४ ('सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्स') आणि द इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडिया ('एसएस-२') द्वारे जारी केलेल्या जनरल मीटिंग्जवरील सेक्रेटरीअल स्टँडर्डसह वाचलेले, भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने जारी केलेले सामान्य परिपत्रक क्रमांक १४/२०२० दिनांक ८ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक १७/२०२० दिनांक १३ एप्रिल २०२०, सामान्य परिपत्रक क्रमांक ११/२०२२ दिनांक २८ डिसेंबर २०२२, सामान्य परिपत्रक क्रमांक ९/२०२३ दिनांक २५ सप्टेंबर २०२३, सामान्य परिपत्रक क्रमांक ०९/२०२३ दिनांक १९ सप्टेंबर २०२४ आणि सामान्य परिपत्रक क्रमांक ०३/२०२५ दिनांक २२ सप्टेंबर २०२५ सह वाचले जाईल (यापुढे एकत्रितपणे 'एमसीए परिपत्रके' म्हणून संदर्भित) आणि सर्व/किंवा इतर कोणतेही लागू कायदे, नियम आणि नियम (सध्या लागू असलेल्या कोणत्याही वैधानिक सुधारणा किंवा पुर्नअधिनियमांसह), २२ मे, २०२६ ('पोस्टल बॅलट नोटिस') मध्ये समाविष्ट असलेल्या व्यवसायाचे व्यवहार करण्यासाठी कंपनीच्या सदस्यांची मान्यता मिळविण्यासाठी, पोस्टल बॅलटद्वारे खालील व्यवसायांसाठी फक्त रिमोट ई-व्होटिंग प्रक्रियेद्वारे ठराव पारित करून:

| अ. क्र. | तपशील | रिझोल्यूशन प्रकार |
|---|---|---|
| १. | श्री. बाळासाहेब सावंत (DIN: ०७७४३५०७) यांची कंपनीचे पूर्णवेळ संचालक आणि प्रमुख व्यवस्थापकीय अधिकारी म्हणून दिनांक २६ मे २०२६ ते २५ मे २०२९ या कालावधीसाठी सलग तीन (३) वर्षांच्या पुढील मुदतीसाठी पुनर्नियुक्ती. | विशेष |

वर नमूद केलेल्या तरतुदी आणि एमसीए परिपत्रकांचे पालन करून, पोस्टल बॅलट नोटीस ('सूचना') मंगळवार, २१ जुलै, २०२६ रोजी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने ई-व्होटिंगची प्रक्रिया आणि पद्धत दर्शविणारी, ज्या सदस्यांची नावे १७ जुलै, २०२६ रोजी ('कट-ऑफ डेट') सदस्यांच्या नोंदणीमध्ये / लाभार्थी मालकांच्या यादीत आहेत आणि ज्यांचे ई-मेल आयडी आरटीए/कंपनी/ठेवींमध्ये नोंदणीकृत आहेत त्यांना पाठवण्यात आली आहे.

या पोस्टल मतदानासाठी सदस्यांना पोस्टल मतदान फॉर्म आणि प्री-पेड व्यवसाय उत्तर लिफाफ्यासह सूचनेची भौतिक प्रत पाठवली जात नाही. सदस्यांची संमती किंवा असहमती दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे कळवली जाईल.

सेबी लिस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ४४ चे पालन करून आणि नियमांसह वाचलेल्या कायद्याच्या कलम १०८ आणि कलम ११० च्या तरतुदींनुसार, कंपनीने तिच्या सदस्यांना रिमोट ई-व्होटिंग सुविधा प्रदान करण्याच्या उद्देशाने नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ('एनएसडीएल') च्या सेवा नियुक्त केल्या आहेत.

सर्व सदस्यांना कळविण्यात येते की:

(I) रिमोट ई-व्होटिंग गुरुवार, २३ जुलै, २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता (भाप्रवे) सुरू होईल आणि शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता (भाप्रवे) संपेल. उपरोक्त तारीख आणि वेळेनंतर ई-व्होटिंगला परवानगी दिली जाणार नाही आणि त्यानंतर मतदानासाठी NSDLद्वारे ई-व्होटिंग मॉड्यूल अक्षम केले जाईल.

(II) सदस्यांचे मतदानाचे अधिकार कंपनीच्या पेड-अप इक्विटी शेअर कॅपिटलमधील त्यांच्या शेअरच्या प्रमाणात असतील, जे कट-ऑफ डेट म्हणजेच शुक्रवार, १७ जुलै, २०२६ रोजीचे असेल. संबंधित तारखेला शेअरहोल्डर नसलेल्या व्यक्तीने ही सूचना केवळ माहितीच्या उद्देशाने घ्यावी.

(III) कंपनीने सीएस सनम उंबरगीकर (एफसीएस ११७७७), मेसर्स डीएसएम अँड असोसिएट्स, कंपनी सेक्रेटरीजचे भागीदार (यापुढे 'प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी' किंवा 'पीसीएस') यांची ई-व्होटिंग प्रक्रिया निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी स्क्रूटिनायझर म्हणून नियुक्ती केली आहे.

(IV) पोस्टल बॅलटच्या सूचनेच्या नोट्समध्ये ई-व्होटिंगची प्रक्रिया दिली आहे. कोणत्याही शंका असल्यास, तुम्ही www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड विभागात उपलब्ध असलेल्या शेअरहोल्डर्ससाठी वारंवार विचारले जाणारे प्रश्न (FAQs) आणि शेअरहोल्डर्ससाठी ई-व्होटिंग वापरकर्ता पुस्तिका पाहू शकता किंवा टोल फ्री क्रमांक: १८०० १०२० ९९० आणि १८०० २२ ४४ ३० वर कॉल करू शकता किंवा evoting@nsdl.com वर वरिष्ठ व्यवस्थापक सुश्री पल्लवी म्हात्रे यांना विनंती पाठवू शकता.

(V) सदस्य कंपनीच्या वेबसाइट www.supriyalifescience.com वरून किंवा NSDL's च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वरून सूचना डाउनलोड करू शकतात. सूचनेची प्रत BSE च्या वेबसाइट www.bseindia.com आणि NSE च्या वेबसाइट www.nseindia.com वर देखील उपलब्ध आहे.

(VI) ई-मतदानाची अंतिम तारीख शुक्रवार, २१ ऑगस्ट, २०२६ आहे, ही एसएस-२ नुसार ठराव मंजूर करण्याची प्रभावी तारीख मानली जाईल.

सदस्यांना पोस्टल मतदानाच्या सूचनेतील सर्व नोंदी आणि विशेषतः रिमोट ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचण्याची विनंती आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**सुप्रिया लाईफसायन्स लिमिटेड करिता**
**स्वाक्षरी/-**
**प्राची साठे**
**कंपनी सेक्रेटरी व कॉम्प्लायन्स ऑफिसर**

**दिनांक: २१ जुलै, २०२६**
**ठिकाण: मुंबई**

**बायर क्रॉपसायन्स लिमिटेड**
**सीआयएन :** एल२४२१०एमएच१९५८पीएलसी०११९७३
**नोंदणीकृत कार्यालय :** बायर हाऊस, सेंट्रल ॲव्हेन्यू, हिरानंदानी ईस्टेट, ठाणे (पश्चिम) - ४०० ६०७.
**टेलि क्र.:** ०२२-२५३१ १२३४; **फॅक्स:** ०२२-२५४५ ५०६३
**मोबाईल क्र.:** +९१ ७७००९ १०४९९
**वेबसाइट :** www.bayer.in; **ईमेल :** ir_bcsl@bayer.com

**६८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, रिमोट ई-वोटिंग व बुक क्लोझर संबंधित माहिती**

**सूचना** याद्वारा देण्यात येते की, **कंपनीची ६८वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") बुधवार, १९ ऑगस्ट, २०२६ रोजी स. ११:३० वा (भाप्रवे) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग ("व्हिसी")/ अदर ऑडिओ-व्हिज्युअल मिन्स ("ओएव्हीएम") द्वारा घेण्यात येणार आहे.** सभेचे ठिकाण कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय म्हणजेच "बायर हाऊस, सेंट्रल ॲव्हेन्यू, हिरानंदानी ईस्टेट, ठाणे (पश्चिम)- ४०० ६०७" येथे असल्याचे मानले जाईल.

कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय, भारत सरकार ("एमसीए") द्वारा या संबंधित निर्गमित केलेले तदनंतरच्या परिपत्रकांसह दिनांकित ०८ एप्रिल, २०२०, १३ एप्रिल, २०२०, ०५ मे, २०२० आणि नवीनतम दिनांकित २२ सप्टेंबर, २०२५, सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") द्वारा तिचे मास्टर परिपत्रक दिनांकित ०३ ऑक्टोबर, २०२४ यासह वाचलेल्या दिनांकित ११ नोव्हेंबर, २०२४ आणि या संबंधित निर्गमित केलेले अन्य सर्व लागू कायदे व परिपत्रकांच्या अनुपालनार्थ वार्षिक अहवाल इतर गोष्टींसमवेत समाविष्ट संचालकांचा अहवाल, कॉर्पोरेट निगमित शासन अहवाल, व्यवसाय जबाबदारी व शाश्वतता अहवाल, व्यवस्थापन चर्चाविनिमय व विश्लेषण अहवाल, लेखापरीक्षकांचे अहवाल आणि लेखापरीक्षित वित्तीय विवरणे प्राप्त होण्यासाठी लिंकसमवेत ६८व्या "एजीएम"ची सूचना अशा सर्व सदस्यांना इमेल केलेले आहेत ज्यांचे ईमेल पत्ते कंपनी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्सकडे नोंदणीकृत आहेत.

इलेक्ट्रॉनिक प्रणालीत पाठवण्याचे काम मंगळवार, २१ जुलै, २०२६ रोजी पूर्ण करण्यात आले आहे. ६८व्या "एजीएम"ची सूचना व वार्षिक अहवाल www.bayer.in या कंपनीच्या वेबसाइटवर तसेच www.evoting.nsdl.com या नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("एनएसडीएल") च्या वेबसाइटवर आणि www.bseindia.com या बीएसई लिमिटेडच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

**रिमोट ई-वोटिंग व "एजीएम" दरम्यान ई-वोटिंगकरिता सूचना**

कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४च्या नियम २० यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३च्या कलम १०८ आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लीगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५च्या रेग्युलेशन ४४ च्या तरतुदींच्या अनुसार सदस्यांना "एजीएम" ठिकाणाखेरीज अन्य ठिकाणावरून "एनएसडीएल"द्वारा तरतूद केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीचा वापर करून "एजीएम"च्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर त्यांचे मतदान करण्याकरिता ("रिमोट ई-वोटिंग") सुविधेची तरतूद करून दिलेली आहे आणि सदर मतदानाद्वारे कामकाजावर विचारविनिमय करण्यात येईल.

रिमोट ई-वोटिंग कालावधी **रविवार, १६ ऑगस्ट, २०२६ रोजी (स. ०९:०० वा. भाप्रवे) सुरू होईल आणि मंगळवार, १८ ऑगस्ट, २०२६ रोजी (सायं. ०५:०० वा. भाप्रवे) संपेल.** या कालावधीत सदस्य इलेक्ट्रॉनिक प्रणालीत त्यांचे मतदान करू शकतील. रिमोट ई-वोटिंग मॉड्यूल त्यानंतर मतदान करण्यास "एनएसडीएल"द्वारा निःसमर्थ करण्यात येणार आहे.

सदस्यांच्या मतदानाचे हक्क **बुधवार, १२ ऑगस्ट, २०२६ ("कट-ऑफ तारीख")** रोजी प्रमाणे कंपनीच्या भरणा केलेल्या इक्विटी भाग भांडवलात त्यांच्याकडील असलेल्या इक्विटी भागांच्या प्रमाणशीर असणार आहेत. कोणतीही व्यक्ती, जी कट-ऑफ तारखेनुसार कंपनीचा सदस्य आहे ती "एजीएम"मधील मतदान किंवा रिमोट ई-वोटिंग सुविधेचा वापर करून "एजीएम"च्या सूचनेमध्ये नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यास पात्र आहे.

ज्या सदस्यांनी "एजीएम"पूर्वी रिमोट ई-वोटिंगमार्फत मतदान केलेले आहे ते "व्हिसी"/ "ओएव्हीएम"द्वारा "एजीएम"मध्ये हजर राहू शकतील/ सहभागी होवू शकतील, तथापी, ते त्यांचे मतदान पुन्हा करण्यास पात्र असणार नाहीत. "व्हिसी"/ "ओएव्हीएम"द्वारा "एजीएम"मध्ये उपस्थित राहणारे सदस्य ज्यांनी रिमोट ई-वोटिंगमार्फत त्यांचे मतदान केलेले नाही आणि अन्यथा मतदानापासून त्यांना बंदी केलेली नाही, ते "एजीएम" दरम्यान रिमोट ई-वोटिंग सिस्टमद्वारे मतदान करण्यास पात्र असणार आहेत. सदस्याद्वारा ठरावावर एकदा मतदान केले गेल्यास, तद्नंतर त्यास सदर मतदान बदलण्यास अनुमती दिली जाणार नाही.

जी व्यक्ती "एजीएम"ची सूचना पाठविल्यानंतर कंपनीचा सदस्य बनते आणि भाग प्राप्त करते आणि तिच्याजवळ कट-ऑफ तारखेनुसार भाग आहेत, ती evoting@nsdl.com यावर विनंती पाठवून लॉगइन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापी, जर व्यक्ती आधीच रिमोट ई-वोटिंगकरिता "एनएसडीएल"कडे नोंदणीकृत आहे, तर ती विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल.

रिमोट ई-वोटिंग सुविधेसंबंधित कोणत्याही शंका असल्यास, कृपया फ्रिक्वेंटली आस्क्ड क्वेश्चन्स ("एफएक्यू'ज") आणि/ किंवा www.evoting.nsdl.com च्या डाउनलोड सेक्शनवर भागधारकांकरिता उपलब्ध असलेले ई-वोटिंग युजर मॅन्युअल पाहावे किंवा ०२२-४८८६ ७००० यावरून "एनएसडीएल"शी संपर्क साधता येईल किंवा evoting@nsdl.com यावरून श्रीमती पल्लवी म्हात्रे, वरीष्ठ व्यवस्थापक - "एनएसडीएल" यांना विनंती पाठवावी.

श्री. भास्कर उपाध्याय (सदस्यत्व क्र. ८६६३, एफसीएस क्र. ९६२५) किंवा त्यांच्या अनुपस्थितीत श्री. भरत उपाध्याय (सदस्यत्व क्र. ५४३६, एफसीएस क्र. ४४५७) मेसर्स एनएल भाटिया अँड ॲसोसिएट्सचे, यांची "एजीएम" दरम्यान होणाऱ्या मतदानाची छाननी आणि रिमोट ई-वोटिंग प्रक्रिया स्वच्छ व पारदर्शक पद्धतीत पार पाडण्याकरिता परिनिरीक्षक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

**बुक क्लोझर व लाभांशावरील टीडीएस**

**याअधिक सूचना** देण्यात येते की. कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१च्या अनुसार, कंपनीच्या सदस्यांची नोंदवही आणि भाग हस्तांतरण पुस्तिका "एजीएम"च्या हेतुप्रीत्यर्थ आणि ३१ मार्च, २०२६ रोजी संपलेल्या वित्तीय वर्षाकरिता कंपनीच्या इक्विटी भागांवरील अंतिम लाभांशाच्या प्रदानाकरिता **गुरुवार, ०६ ऑगस्ट, २०२६ रोजी पासून ते गुरुवार, १३ ऑगस्ट, २०२६ रोजी पर्यंत (दोन्ही दिवस धरून)** बंद ठेवण्यात येईल. **अंतिम लाभांशाचे प्रदान, जर "एजीएम"मध्ये घोषित झाल्यास, गुरुवार, ०३ सप्टेंबर, २०२६ रोजी किंवा त्यानंतर,** अशा सदस्यांना **करण्यात येणार आहे,** ज्यांची नावे **बुधवार, ०५ ऑगस्ट, २०२६** रोजी इक्विटी भागधारक म्हणून कंपनीच्या सदस्यांच्या नोंदवहीत आणि या प्रयोजनार्थ डिपॉझिटरीजद्वारा सादर केलेल्या तपशीलानुसार सदर तारखे दिवशी दिवस संपताच इक्विटी भागांच्या लाभाधिकारी मालकांकडे डिमटेरिअलाईज्ड स्वरूपात असलेल्या भागासंबंधित आलेली आहेत.

आयकर कायदा, २०२५ ("कायदा") च्या अनुसार कंपनीद्वारा वितरित केलेले व प्रदान केलेले लाभांश भागधारकांच्या हाती करयोग्य आहेत आणि कंपनीने वेळोवेळी अधिसूचित केल्यानुसार विहित दरांवर (अधिक लागू अधिभार आणि उपकर) भागधारकांना प्रदान केलेल्या लाभांशातून डिटक्ट टॅक्स ॲट सोर्स ("टीडीएस") कापून घेणे आवश्यक आहे. भागधारकांच्या विविध प्रवर्गांकरिता टीडीएस दर लागू होण्याबाबतची माहिती आणि आवश्यक कागदपत्रे www.bayer.in या कंपनीच्या वेबसाइटवरील इन्व्हेस्टर सेक्शनअंतर्गत उपलब्ध आहेत. भागधारकांना विनंती करण्यात आली आहे की, कंपनीला लाभांशाच्या प्रदानावरील योग्य टीडीएस कपात करण्यास सक्षम होण्याकरिता सर्व बाबतीत पूर्ण असलेली सर्व आवश्यक कागदपत्रे **बुधवार, ०५ ऑगस्ट, २०२६** रोजी किंवा तत्पूर्वी dividend.india@bayer.com यावरून ईमेलद्वारे पाठवावीत.

**स्पीकर नोंदणी**

सदस्य जे त्यांची मते व्यक्त करू इच्छित आहेत किंवा "एजीएम" दरम्यान त्यांना प्रश्न विचारायचे असल्यास ते **शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२६ (स. ०९:०० वा. भाप्रवे) पासून ते बुधवार, १२ ऑगस्ट, २०२६ (सायं. ०५:०० वा. भाप्रवे) पर्यंत** ir_bcsl@bayer.com यावर त्यांचे नाव, डीपी आयडी व क्लाईंट आयडी/ फोलिओ नंबर, पॅन, मोबाईल नंबर नमूद करून त्यांच्या नोंदणीकृत पत्त्यावर विनंती पाठवून स्पीकर म्हणून स्वतःची नोंदणी करू शकतील. ज्या सदस्यांनी स्पीकर म्हणून स्वतःची नोंदणी केलेली आहे, त्यांनाच केवळ "एजीएम" दरम्यान त्यांची मते मांडण्यास/ प्रश्न विचारण्यास अनुमती देण्यात येणार आहे. कंपनी "एजीएम"करिता उपलब्धतेवर आधारित स्पीकर्सच्या संख्येत मर्यादा ठेवण्याचा हक्क राखून ठेवीत आहे.

**बायर क्रॉपसायन्स लिमिटेडकरिता**
स्वाक्षरी /-
**भारती शेट्टी**
कंपनी सेक्रेटरी व अनुपालन अधिकारी
(सदस्यत्व क्र. एसीएस २४१९९)

स्थळ : ठाणे
दिनांक : २२ जुलै २०२६